ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– I (Special Issue-III) JAN – FEB 2024

Original Research Article

# समर्थ रामदास आणि आधुनिक व्यवस्थापन यांच्यातील साम्य - एक अभ्यास

*** प्रा. डॉ. विमुक्ता राजे,**

** प्राध्यापक, जनसंज्ञापन आणि पत्रकारिता विभाग, जोशी बेडेकर कला वाणिज्य महाविद्यालय, (स्वायत्त) ठाणे*

**गोषवारा (Abstract):**

*मध्ययुगीन काळातील समर्थ रामदास एक महत्त्वाचे संत होते. चारशे वर्षांपूर्वी आजूबाजूला कोणत्या घडामोडी घडत आहेत याची त्यांना अचूक जाण होती. बदलत्या राजकारणास योग्य असा समाज निर्माण करण्यासाठी त्यांनी प्रयत्नवादाची शिकवण दासबोध ग्रंथातून दिली.*

*दासबोधातील ओव्यांकडे प्रस्तुत संशोधकाने व्यवस्थापनशास्त्राच्या दृष्टिकोनातून पाहिले आणि त्यातून आधुनिक व्यवस्थापन तसेच व्यवस्थापक यांचे समर्थांच्या शिकवणुकीशी, त्यांच्या महंताशी काही साम्य आहे असे आढळले. व्यवस्थापनशास्त्र म्हणजे व्यवहारशास्त्र. समर्थांनी दासबोधातून प्रत्येकाने व्यवहारात, संघटनेत कसे वागावे याचा परिपाठ दिला आहे. समर्थांची विचारप्रणाली आधुनिक व्यवस्थापनशास्त्राशी कशी मेळ राखणारी आहे हे संशोधन निबंधात शोधले आहे.*

**Copyright © 2024 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

**प्रास्ताविक:** `

भारतातील विकसित ज्ञान आणि शिक्षण पध्दती : प्राचीन ते समकालीन' या राष्ट्रीय परिषदेत प्रस्तुत शोध निबंध सादर करत आहे. मध्ययुगीन काळातील समर्थ रामदास यांचे विचार आणि उपदेश समकालातील व्यवस्थापनशास्त्राशी कसे जुळत आहेत याचा शोध या निबंधात घेतला आहे.

समर्थ रामदास हे संत पंचकातील एक महत्त्वाचे संत म्हणून ओळखले जातात. 'संत' या उपाधीप्रमाणे 'समर्थ' ही उपाधी त्यांना सर्वार्थाने सार्थ ठरते.

त्या कालखंडाचे म्हणजे चारशे वर्षांपूर्वीच्या कालखंडाचे मर्म त्यांनी बरोबर ओळखले होते. आपल्या भोवतालच्या जगामध्ये कोणत्या घडामोडी चालल्या आहेत. कोणत्या उलाढाली चालल्या आहेत. राजकारणाच्या कोणत्या चळवळी चालल्या आहेत. लौकिक, व्यावहारिक जीवनात कोणत्या नवीन विचारांचे वारे वाहू लागले आहेत आणि परिस्थिती कशी बदलत

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– I (Special Issue-III) JAN – FEB 2024

Original Research Article

चालली आहे याचा नेमका अंदाज रामदासांनी घेतला.

रामदासांचा आणि त्यांच्या वाङ्मयांचा काळ सतरावे शतक अर्थात् मध्ययुगीन कालखंड आहे. त्याकाळात रामदासांनी परमार्थाबरोबरच प्रपंचाची सांगड घातली. इतकेच नाही तर त्यास प्रयत्नवादाची जोड दिली.

संतांच्या जीवनाचा हेतू एखादा उद्योग चालवावा असा नव्हता. कारण 'उद्योग' ही संकल्पनाच आधुनिक काळातील आहे. मग चारशे वर्षापूर्वी होऊन गेलेल्या समर्थ रामदासांच्या साहित्यात हा विचार कसा आढळतो? तर रामदासांसारख्या राष्ट्रचिंतक संतांच्या साहित्यामध्ये पारलौकिक जीवनाइतकेच भौतिक जीवनास महत्त्व होते. कारण ती काळाची गरज होती. व्यक्तिजीवन, समाजजीवन आणि राष्ट्रजीवन असा एकूणच विचार समर्थ रामदासांनी केला आहे, तो महाराष्ट्रधर्म आणि समर्थ संप्रदाय यांच्या जडणघडणीसंदर्भात. दासबोधासारख्या ग्रंथातून केलेला उपदेश हा त्यांच्या शिष्यांसाठी तसेच तत्कालीन समाजासाठीही होता. समर्थांच्या दासबोधातील ओव्यांकडे प्रस्तुत संशोधकाने व्यवस्थापनातील सूत्रे या दोहोतील साम्य उलगडून दाखवण्याचा प्रयत्न या संशोधन निबंधात केला आहे.

सुसंवाद, नियोजन, कार्यप्रेरणा, संघटन, ध्येय, नेतृत्व, मनुष्यबळ हे सारे विषय व्यवस्थापन शास्त्रात येतात. तसेच ते समर्थ रामदासांच्या लेखनातही स्पष्टपणे येतात.

अतिविस्ताराच्या भयास्तव काही निवडक ओव्यांच्या आधारे हे साम्य उलगडले आहे.

**नियोजन :**

मानवी जीवनात नियोजनाचे महत्त्व विशद करताना रामदास म्हणतात - **'यत्न हाच देव'** आहे. यात त्यांनी प्रयत्नाला महत्त्वाचे स्थान दिले आहे. व्यक्तिगत व सामाजिक जीवनात काहीतरी निश्चित प्रयत्न व नियोजन हवे, ही जी आधुनिक धारणा आहे, तिला समांतर अशी धारणा रामदासांनी सोप्या शब्दांत व्यक्त केली आहे.

**व्यापेवीण आटोप केला। तो अवघा घसरतचि गेला।**

**अकलेचा बंद नाही घातला। दुरीदृष्टीने॥ (१९-८-१५) (१)**

विवेक करून पूर्वयोजना न आखता जर लोकसमुदाय जमवला तर सांभाळता येत नाही. प्रथमच दूरदृष्टी वापरून विवेकाने ज्या मर्यादा घालायला हव्या होत्या त्या न घातल्यास अनावर प्रसंग ओढवतो.

**अंतरी नाही सावधानता। येत्न ठाकेना पुरता।**

**सुख संतोषाची वार्ता। तेथे कैची॥ (१२-९-७) (२)**

चांगला प्रयत्न होण्यास मनात सावधानता पाहिजे. मनुष्याची अंगी सावधानता नसेल तर त्याच्या हातून शेवटपर्यंत प्रयत्न होत नाही. आणि ज्यांच्या हातून असा दीर्घ प्रयत्न होत नाही त्यांच्या जीवनात सुखसंतोषाचा अनुभव येत नाही.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– I (Special Issue-III) JAN – FEB 2024

Original Research Article

**केल्याने होत आहे रे । आधी केलेचि पाहिजे ।**

प्रत्येक गोष्ट प्रयत्नसाध्य आहे. 'प्रयत्न हाच परमेश्वर' अशी मनाशी खूणगाठ बांधून सकारात्मक दृष्टीने काम केले की, यश मिळते असे रामदास सांगतात.

**संघटन कौशल्य :**

संघटन म्हणजे एखाद्या समान उद्दिष्टासाठी कार्य करणा-या अनेक व्यक्तींच्या प्रयत्नांमध्ये समन्वय प्रस्थापित करण्याची क्रिया होय.

रामदासांचे वाङ्मय हे समाज प्रबोधन, समाज संघटन यासाठी लिहिलेले दिसते. आपल्या वाङ्मयाद्वारे रामदासांनी केवळ आध्यात्मिक विचार ठेवला नाही तर त्याचबरोबर व्यक्तिगत जीवनाच्या विकासातून राष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण करून सामाजिक परिवर्तनाचा विचार सर्व समाजासमोर ठेवला. सामाजिक परिवर्तन घडवण्यासाठी समाज एकत्र करून समाजाचे संघटन करणे महत्त्वाचे मानले.

या संघटनेकरता रामदासांनी अफाट लोकसंग्रह केला. लोकसंग्रह करीत करीत भारतभर साधारण अकराशे मठस्थापन केले असे म्हटले जाते.

**सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचे । (२०-४-२६) (३)**

समाजपरिवर्तनासाठी रामदासांनी संघटनशास्त्राचा वापर केला. विवेक, बुद्धिवाद, ज्ञान आणि विचार या चतु:सूत्रीवर त्यांचे संघटन आधारित होते.

**लोकी लोक वाढविले । तेणे अमर्याद झाले ।**

**भूमंडळी सत्ता चाले । गुप्तरूपे ।। (१५-२-२६) (४)**

एका व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीशी जोडता येते, दुसऱ्याला तिसऱ्याशी आणि हा पसारा वाढत जातो. संघटनेतही हे सूत्र राबविल्यास कार्यकर्त्यांची एक फळी या संघटकापाठी उभी राहते. मग तो नेता जनाधार असलेला लोकनेता, संघटक म्हणून ओळखला जातो.

**कोण कोण राजी राखले । कोण कोण मनी भंगले ।**

**क्षणक्षणा परीक्षिले । पाहिजे लोक ।। (१९-७-६) (५)**

आपल्यावर कोण प्रसन्न आहे, आपण कोणाचा मनोभंग केला आहे, आपण कोणाचे मन दुखावले आहे, हे लोकांची वारंवार परीक्षा घेऊन तपासून पहावे.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– I (Special Issue-III) JAN – FEB 2024

Original Research Article

**सुसंवाद :**

मानवी जीवनात सर्वात जास्त महत्त्व संवादाला असते हे रामदासांनी जाणले होते.

**कठिण शब्दे वाईट वाटते । हे तो प्रत्ययास येते ।**

**जरी मग वाईट बोलावे ते । काय निमित्य ।। (१२-१०-२३) (६)**

कोणी कठोर शब्द बोलला तर मनाला वाईट वाटते. हा प्रत्यक्ष अनुभव येतो. तर विनाकारण वाईट बोलू नये हे उत्तम.

**पेरिले ते उगवते । बोलण्यासारखे उत्तर येते ।**

**तरी मग कर्कश बोलावे ते । काय निमित्य ।। (१२-१०-२६) (७)**

जे बी पेरावे तेच उगवते. आपण जसे बोलावे तसे उलट उत्तर येते. असे जर आहे तर मग विनाकारण कठोर व कटू शब्द न बोलावे हे उत्तम.

**राखावी बहुतांची अंतरे । भाग्य येते तद्वंतरे ।**

**ऐसी ही विवेकाची उत्तरे । ऐकणार नाही ।। (१९-४-१८) (८)**

अनेक लोकांची अंत:करणे राजी राखावी तेव्हाच भाग्य प्राप्त होते.

**कार्यप्रेरणा :** व्यवस्थापनात 'मानवी घटक' हा सर्वात महत्त्वाचा मानला जातो. या मानवी घटकांना कृतिशील बनवणे व त्याचे उत्स्फूर्त सहकार्य मिळविणे ही कोणत्याही व्यवस्थापनाची एक समस्या आहे. उद्दिष्ट्ये गाठण्यासाठी या मानवी घटकाचा विधायक वापर करावा लागतो. त्याला कौशल्याने हाताळण्याची गरज असते. व्यवस्थापनातील ही संकल्पना समर्थांनी 'दासबोधा'तही मांडली आहे.

**कोणी येक काम करिता होते । न करिता मागे पडते ।**

**या कारणे ढिलेपण ते । असोचि नये ।। (१९-९-१५) (९)**

कोणतेही काम सुरु केले म्हणजे ते होते, न केल्यास मागे पडत जाते. यासाठी ढिलेपणा म्हणजे चालढकल, दिरंगाई मुळीच करू नये.

**अखंड कामाची लगबग । उपासनेस लावावे जग ।**

**लोक समजोन मग । आज्ञा इच्छिती ।। (११-१०-१९) (१०)**

प्रत्येकाने आपले काम वेळेत व लवकर पूर्ण करावे. काम झाल्यावर मिळालेला मोकळा वेळ भगवंताच्या उपासनेत व्यतित करावा. अशाप्रकारे वागले की लोकांमध्ये, समाजात आपोआप मान मिळतो व ते आपले नेतृत्व स्वीकारण्यास तयार होतात.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– I (Special Issue-III) JAN – FEB 2024

Original Research Article

**अधिकार प्रदान तत्त्व :** अधिकार प्रदान करणे ही संघटन प्रक्रियेतील महत्त्वाची पायरी होय. व्यवस्थापकीय कार्यक्षमतेसाठी अधिकाराचे वितरण करणे आवश्यक असते. प्रत्येक अधिकाऱ्याची किंवा कर्मचाऱ्याची कार्यक्षमता लक्षात घेऊन त्यांच्यावर सोपवलेली जबाबदारी कार्यक्षमतेने पूर्ण करणे यालाच अधिकार प्रदान असे म्हणतात. आधुनिक व्यवस्थापन शास्त्रातील अत्यंत महत्त्वाची अशी संकल्पना समर्थ रामदासांनी पुढीलप्रमाणे मांडली आहे.

**अधिकार परत्वे कार्य होते । अधिकार नसतां वेर्थ जाते ।**

**जाणोनि शोधावी चित्ते । नाना प्रकारे ।। (११-१०-२२) (११)**

ज्याची जी लायकी असते त्याच्या शक्तीप्रमाणे त्याच्या हातून कार्य घडते. लायकी व शक्ती नसेल तर कार्य वाया जाते. यासाठी लायकी ठरवण्यास लोकांचे अंतरंग अनेक प्रकारे तपासून पहावे.

**लोक बहुत शोधावे । त्यांचे अधिकार जाणावे ।**

**जाणजाणोन धरावे । जवळ दुरी ।। (११-१०-२१) (१२)**

पुष्कळ लोकांचे सूक्ष्म निरीक्षण करावे, त्यांची लायकी काय ते ओळखावे. मग प्रत्येकाच्या लायकीप्रमाणेच त्याला जवळ अंतरंगात घ्यावे किंवा दूर ठेवावे.

**अधिकार पाहोन कार्य सांगणे । साक्षेप पाहोन विश्वास धरणे ।**

**आपला मगज राखणे । काही तरी ।। (११-१०-२३) (१३)**

माणसाची लायकी बघून त्याला झेपेल असे काम त्यास सांगावे. माणसाची कष्ट करण्याची ताकद पाहून त्याचा विश्वास धरावा. पण हे सगळे करताना आपले महत्त्व, वजन व मोठेपणा टिकवून धरावे.

**मनुष्यबळ विकास :**

'मनुष्य व्यवस्थापना'च्या किंवा 'मानव संसाधन विकासा'च्या केंद्रस्थानी आहे, अर्थातच 'मानव' आहे. कोणत्याही संघटनेच्या किंवा संस्थेच्या कार्यक्षमतेचे यश हे मानवी श्रमाच्या (शारीरिक व मानसिक) प्रमाणावर अवलंबून आहे. मानवी सामर्थ्य, कौशल्य आणि ज्ञान जर नसेल तर नैसर्गिक साधनसामुग्रीचा काहीही उपयोग होणार नाही.

**कार्यकर्ता आणी निकामी । शूर आणी कुकर्मी ।**

**धर्मी आणी अधर्मी । कळला पाहिजे ।। (१६-९-२७) (१४)**

कार्य करणारा आणि कार्य करू न शकणारा, शूर आणि वाईट कर्मे करणारा, धार्मिक वृत्तीचा आणि अधार्मिक वृत्तीचा कोण आहे हा भेद कळणे आवश्यक आहे.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– I (Special Issue-III) JAN – FEB 2024

Original Research Article

**वरिष्ठ आणी कनिष्ठ । भ्रष्ट आणी अंतरनिष्ठ ।**

**सारासार विचार स्पष्ट । कळला पाहिजे ।। (१६-६-२९) (१५)**

वरिष्ठ म्हणजे श्रेष्ठ कोण आणि कनिष्ठ कोण, भ्रष्ट कोण आणि अंतर्निष्ठ कोण हा सारासार विचार अगदी स्पष्टपणे कळला पाहिजे.

**या कारणे आचारशुद्ध । त्याउपरी विचार शुद्ध ।**

**वीतरागी आणी सुबुद्ध । ऐसा पाहिजे ।। (१३-१०-१६) (१६)**

शुद्ध आचार असलेला, त्यात शुद्ध विचार असलेला अनासक्त मनाचा आणि शुद्ध बुद्धीचा माणूस इतर माणसांपेक्षा केव्हाही श्रेष्ठ दर्जाचा असतो.

**गुण व्यवस्थापन:**

गुणव्यवस्थापन ही एक संकल्पना अलीकडील काळात प्रसिद्ध झाली आहे. सध्याच्या स्पर्धायुक्त बाजारपेठेत गुणवत्तेला (Quality Control) ला महत्त्व आहे. आज व्यवस्थापनातील प्रत्येक क्षेत्रात दर्जेदारपणाला प्राधान्य दिले जाते. त्यासाठीच चांगली माणसे, उत्कृष्ट यंत्रसामुग्री, चांगल्या दर्जाचा कच्चा माल व चांगले तंत्र या सर्वांचा उपयोग करण्यावर भर असतो. गुणवत्ता म्हणजे विशिष्ट कामाची परिपूर्णता होय.

**उत्कट भव्य तेचि घ्यावे । मळमळीत अवघेचि टाकावे ।**

**निस्पृहपणे विख्यात व्हावे । भूमंडळी ।। (११-६-१५) (१७)**

समाजनेत्याने जे उत्कट आणि भव्य असेल त्याचाच स्वीकार करावा. जे तेजोहीन, गतिहीन व बलहीन असेल त्याचा त्याग करावा. आपल्या निस्पृहपणाने त्याने जगात प्रसिद्ध व्हावे. नेता एका अर्थाने दिव्य दृष्टीचा असावा. वर्तमान परिस्थितीवरून अंदाज केला असता जी गोष्ट घडून येणे, अशक्य वाटते, तिची कल्पना करण्याची विशाल दृष्टी त्याच्या अंगी असली पाहिजे.

**उत्तम गुण तितुके घ्यावे । घेऊन जनास सिकवावे ।**

**उदंड समुदाय करावे । परी गुप्तरुपे ।। (११-१०-१८) (१८)**

आपण स्वत: उत्तम गुण घ्यावे आणि मग लोकांना शिकवावे, मोठमोठे लोकसमूह बनवावे, पण ते गुप्त असावे.

**ताणतणाव व्यवस्थापन :**

व्यक्तिगत जीवनात, संस्थेत किंवा संघटनेत काम करणा-या व्यक्ती सतत ताणतणावाखाली किंवा कोणत्या तरी दडपणाखाली वावरत असल्यास त्याचा परिणाम संस्थेच्या कार्यप्रणालीवर होत असतो. कर्मचा-यांना कार्यक्षम बनवण्यासाठी, त्यांच्यातील कार्यक्षमता वाढविण्यासाठी व त्यांना अधिकाधिक चांगले कार्य करण्यास प्रवृत्त करण्यासाठी तणावमुक्त वातावरण निर्माण

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– I (Special Issue-III) JAN – FEB 2024

Original Research Article

करणे आवश्यक असते. आधुनिक काळात 'ताणतणावाचे व्यवस्थापन' ही संकल्पना महत्त्वाची वाटू लागली आहे. बारा वर्षांच्या भ्रमंतीच्या काळात रामदासांनी समाजाचे सूक्ष्म निरीक्षण केले. समाजाची अवनती का व कशी झाली हे जाणून घेतले. त्यावर आपल्या वाङ्मयाद्वारे उपाय सुचविताना ते लोकशिक्षकाच्या भूमिकेत, समुपदेशकाच्या भूमिकेत अलगदपणे शिरले आहेत असे जाणवते.

रामदासांच्या दासबोधात आधुनिक काळातील इतर शास्त्रांप्रमाणे मानसशास्त्रातील समुपदेशक ज्या पद्धतीने सल्ला देतो, समुपदेशन करतो तसे रामदासांनी त्या काळाच्या व समस्यांच्या गरजेनुसार समुपदेशन केले आहे असे म्हणता येईल.

**चपळपण मनाचे मोडिता मोडवेना ।**

**सकळ स्वजनमाया तोडिता तोडवेना ।**

**घडिघडि बिघडे हा निश्चयो अंतरीचा । ४१ (१९)**

हे मन एवढे चपळ म्हणजे चंचल आहे की, त्याच्या त्या चंचलपणाला आवर घालायचा कितीही प्रयत्न केला, तरी त्यात यश येत नाही. तुझ्या ठायी मन स्थिर व्हायला हवे पण तेही जमत नाही. मनात पुष्कळ निश्चय करतो, पण तो थोडा काळदेखील टिकत नाही.

**होणार तैसे होत जात । प्रपंची जाला आघात ।**

**डळमळिना ज्याचे चित्त । तो सत्त्वगुण ।। (२-७-५७) (२०)**

जे व्हायचे ते होतच जाते, या नियमानुसार प्रपंचामध्ये मोठे संकट आले असता ज्याचे मन डळमळत नाही, जो शांतचित्त राहतो तो सत्वगुणी होय असे रामदास म्हणतात.

**जगी सर्वसुखी असा कोण आहे ।**

**विचारे मना तूंचि शोधूनि पाहे । (११) (२१)**

या जगात सर्वसुखी असा कुणीच नसतो. कितीही शोध घेतला तरी एकही दु:ख नसलेला माणूस सापडत नाही. अपरिहार्यपणे प्रत्येकास कुठले न कुठले दु:ख सहन करावे लागते. आपले दु:ख कमी व्हावे असे वाटत असेल तर दुस-यास नेहमी सुखी ठेवले पाहिजे असे रामदास आपल्या मनास, पर्यायाने समाजास सांगताना दिसतात.

**समर्थाचिया सेवका वक्र पाहे ।**

**असा सर्व भूमंडळी कोण आहे । (३०) (२२)**

हा श्लोक रामदासांनी मनाच्या श्लोकात घेताना राम सदैव पाठीशी आहे असे म्हटले. आधुनिक काळात आपण खरे असू, योग्य असू तर न्यायव्यवस्था, हितचिंतक आपल्या पाठिशी आहेतच. सत्याचा नेहमीच विजय होतो.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– I (Special Issue-III) JAN – FEB 2024

Original Research Article

**व्यवस्थापन नेतृत्त्व :**

व्यवस्थापक हा संस्थेतील काम करणा-या इतर कर्मचा-यांचा नेता असतो. नेतृत्व करणे म्हणजे मार्गदर्शन करणे. संस्थेचा / संघटनेचा नेता हा त्या संस्थेचा जणू आत्माच असतो. व्यवस्थापकीय अभ्यासक्रमांमधून व्यवस्थापकांचे अंगी नेतृत्व गुण कसे विकसित करता येतील याचे प्रशिक्षण दिले जाते. नेतृत्व करताना धैर्य, आत्मविश्वास, नैतिक गुण, नि:स्वार्थीपणा, उत्तम व्यक्तिमत्त्व, पुढाकार घेण्याची इच्छा, निर्णयक्षमता, लोकांच्या भावना समजून घेण्याचे कसब या गुणांची आवश्यकता व्यवस्थापकाच्या अंगी असणे अपेक्षित आहे. बोलताना अतिशय संयमीपणे बोलणे अपेक्षित असते. रामदासांच्या ठिकाणी नेतृत्वाचे हे सर्व गुण दिसून येतात. ते उत्तम व्यवस्थापक, संघटक व सुसंवादक म्हणून लक्षात राहतात. नेत्याने कसे बोलावे, कसे वागावे याचे मार्गदर्शन करताना ते म्हणतात.

**बोलतो खरे चालतो खरे । त्यास मानिती लहानथोर ।**
**न्याय अन्याय परस्परे । सहजचि कळे ।। (१२-२-१५) (२३)**

ज्याचे बोलणे, चालणे खरेपणाचे असते त्यास लहानथोर सारखाच मान देतात. त्यातूनच न्यायाचा किंवा अन्यायाचा पक्ष कोणता हे परस्पर पण सहजच लोकांना कळून येते.

**दोष देखोनी झाकावे । अवगुण अखंड न बोलावे ।**
**दुर्जन सांपडोन सोडावे । परोपकार करूनी ।। (११-५-१०) (२४)**

दुसऱ्यांच्या दोषांवर पांघरूण घालावे, दुसऱ्याचे दुर्गुण सदोदित बोलत बसू नये, दुर्जन अपराधात सापडले असताही (त्यांना शासन न करता) त्यांच्यावर परोपकार करून त्यांना सोडून द्यावे.

**फड नासोचि नेदावा । पडिला प्रसंग सावरावा ।**
**अतिवाद न करावा । कोणी येकासी ।। (११-५-१२) (२५)**

समुदायाची घडी बिघडू देऊ नये, आलेला प्रसंग निभावून न्यावा, त्यातून पार पडावे, कोणाशीही अतिवाद करू नये. रामदासांनी केलेला हा उपदेश त्यांनी स्वत:ही पाळला आणि आजच्या काळातील व्यवस्थापकांनाही तो तंतोतंत लागू पडतो.

**उत्तम गुण तितुके घ्यावे । घेऊन जनांस सिकवावे ।**
**उदंड समुदाय करावे । परी गुप्तरूपे ।। (११-१०-१८) (२६)**
**उत्कट भव्य तेचि घ्यावे । मळमळीत अवघेचि टाकावे**
**निस्पृहपणे विख्यात व्हावे । भूमंडळी ।। (१९-६-१५) (२७)**

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– I (Special Issue-III) JAN – FEB 2024

Original Research Article

सर्व समुदायांमधून उत्कट व भव्य असेल तेवढेच घ्यावे आणि मळमळीत म्हणजेच त्याज्य, कमी दर्जाचे असेल त्याचा त्याग करावा आणि नि:स्पृह बाण्याने जगामध्ये कीर्ती गाजवावी.

**समारोप:**

रामदासांना समाज जागृत करायचा होता, माणसं घडवायची होती. त्यासाठी मार्गदर्शक ठरेल असे उदंड सात्त्विक वाङ्मय त्यांनी निर्माण कोले. लोकोद्धाराचा कृतिशील प्रयोग रामदासांनी केला, म्हणूनच त्यांना 'समर्थ' अशी उपाधी वापरली जाते.

रामदासकालीन समाजात परचक्र मोठ्या प्रमाणात कार्यरत होते. या परचक्र निरूपणाकरता फक्त आध्यात्मिक तत्त्वज्ञान पुरे पडणार नाही हे ओळखून त्यांनी समाजकारण केले. यात लोकांच्या स्वभावाचा, मनाचा अभ्यास केला. दैवतं बदलून समाजास कार्यप्रवृत्त केले.

समाज कार्यप्रवृत्त होऊ लागल्यावर संघटना उभारली. त्याकरता मठस्थापना केली. या उभारणीसाठी व्यवस्थापनाची सूत्रे वापरली. संवादकलेचा उत्तम वापर केला. त्यातून संघटना बांधण्यातील त्यांची कुशल संघटकता दिसून येते. यासाठी नवी दैवतं, नवा संप्रदाय, नवी संघटना उभारली आणि आपल्या कार्यास वैचारिक अधिष्ठान दिले. हे वैचारिक अधिष्ठान विविध प्रकारच्या वाङ्मयनिर्मितीतून शब्दबद्ध केले.

या संशोधन निबंधातून मध्ययुगीन काळातील अर्थात १७ व्या शतकातील समर्थांनी केलेला उपदेश आणि समकालीन म्हणजे २१ व्या शतकातील व्यस्थापन शास्त्रातील सूत्रांमध्ये तंतोतंत साम्य आढळले, ते मांडले आहे. यातून समर्थ रामदासांचे दिसणारे वेगळेपण अधोरेखित केले आहे.

**प्रतिमान : संतत्त्वाच्या पायावर उभे असलेले रामदासांच्या व्यक्तिमत्त्वातील विशेष पैलू –**



ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– I (Special Issue-III) JAN – FEB 2024

Original Research Article

**संदर्भसूची :**

१. पांगारकर ल.रा. (संपा/अनु.) - सार्थ दासबोध, ढवळे प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९२३ अठरावे पुर्नमुद्रण, जून १९९३. (पृ.७०९)

२. तत्रैव (पृ. ४८९)

३. तत्रैव (पृ. ७२९)

४. तत्रैव (पृ. ५७१)

५. तत्रैव (पृ. ७०५)

६. तत्रैव (पृ. ४९३, ४९४)

७. तत्रैव (पृ. ४९४)

८. तत्रैव (पृ. ६९४)

९. तत्रैव (पृ. ७१२)

१०. तत्रैव (पृ. ४६४)

११. तत्रैव (पृ. ४६४, ४६५)

१२. तत्रैव (पृ. ४६४)

१३. तत्रैव (पृ. ४६५)

१४. तत्रैव (पृ. ६२५)

१५. तत्रैव (पृ. ६२५)

१६. तत्रैव (पृ. ५२३)

१७. तत्रैव (पृ. ७०२, ७०३)

१८. तत्रैव (पृ. ४६४)

१९. सरदार गं.बा. (संपा) - रामदासदर्शन अर्थात् रामदासांच्या वाङ्मयातील वेचे, मॉडर्न बुक डेपो प्रकाशन, पुणे, प्र.आ. एप्रिल १९७२. (पृ. ११८)

२०. तत्रैव (पृ. ६०)

२१. पांगारकर ल.रा. (संपा.) - मनोबोध सार्थ व सभाष्य, मनाचे श्लोक, ढवळे प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९२४, पुनर्मुद्रण २०१०. (पृ. ४१, ४२)

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– I (Special Issue-III) JAN – FEB 2024

Original Research Article

२२. तत्रैव (पृ. ६०)

२३. पांगारकर ल.रा. (संपा/अनु.) - सार्थ दासबोध, ढवळे प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९२३ अठरावे पुर्नमुद्रण, जून १९९३. (पृ.४७०)

२४. तत्रैव (पृ. ४५०)

२५. तत्रैव (पृ. ४५०)

२६. तत्रैव (पृ. ४६४)

२७. तत्रैव (पृ. ७२, ७३)

२८. आठल्ये कृ.ना.- श्री समर्थ रामदास स्वामींचे चरित्र, निर्णय सागर प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९०८.

२९. करंदीकर ज.स. - श्री समर्थ चरित्र, समर्थ सेवा मंडळ, सज्जनगड, प्र.आ.१९९८.

३०. ठाकूर योगेश, घाटपांडे महेश. - व्यवसाय व्यवस्थापनशास्त्र तंत्र आणि मंत्र, आमोद प्रकाशन, मुंबई, प्र.आ. २००४.

३१. पलांडे, पंडित व इतर - व्यवस्थापन व त्याचे स्वरूप, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, प्र.आ. २००१.

३२. पांगारकर ल.रा. (संपा/अनु.) - सार्थ दासबोध, ढवळे प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९२३ अठरावे पुर्नमुद्रण, जून १९९३.

३३. पांगारकर ल.रा. (संपा.) - मनोबोध सार्थ व सभाष्य, मनाचे श्लोक, ढवळे प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९२४, पुनर्मुद्रण २०१०.

३४. वाळिंबे रा.शं - राजकारणी संत समर्थ रामदास, नीहारा प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९४५.

३५. शेठ रूपाली आणि इतर - व्यवस्थापनाची तत्त्वे आणि कार्ये, डायमंड पब्लिकेशन पुणे, प्र.आ., ऑगस्ट २००९.

*Cite This Article:*

**प्रा.डॉ. राजे व. (2024).** *समर्थ रामदास आणि आधुनिक व्यवस्थापन यांच्यातील साम्य - एक अभ्यास.* In Educreator Research Journal: Vol. XI (Number I, pp. 83–93). **ERJ.** *https://doi.org/10.5281/zenodo.10797525*